MHAH080004832026

दाखल दिनांक : ०५.०३.२०२६.

नोंदणी दिनांक : ०५.०३.२०२६.

पारीत दिनांक : १२.०३.२०२६.

| कालावधी | वर्षे | महिने | दिवस |
|---|---|---|---|
| | ०० | ०० | ०४ |

**संगमनेर येथील ५ वे सह दिवाणी न्यायाधीश व. स्तर, संगमनेर, ता. संगमनेर, जि. अहमदनगर यांचे न्यायालयात.**

(पिठासीन अधिकारी – प्रसाद बाळकृष्ण जोशी)

**हिंदु विवाह अर्ज क्र.९४/२०२६.**
**नि.क्र. १६.**

१. **सौ. करिश्मा श्रीराम दिघे,**
वय – ३० वर्ष, धंदा – घरकाम,
द्वारा – कैलास सुर्यभान तांबे,
रा. चिंचपुर, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर.

२. **श्री. श्रीराम भास्कर दिघे,**
वय – ३३ वर्ष, धंदा – नोकरी,
रा. लोणी खुर्द, ता. राहाता, जि. अहिल्यानगर.

**अर्जदार**

**आणि**

कोणीही नाही **सामनेवाला**

---

**वकीलपक्षः– अर्जदार क्रं.१ तर्फे – श्री. पी. यु. कडलग, विद्वान विधीज्ञ.**
**अर्जदार क्रं.२ तर्फे – श्री. केशवराव श्रीराम गोडगे, विद्वान विधीज्ञ.**

---

## न्यायनिर्णय

## (जाहीर दिनांक १२, मार्च, २०२६)

सदरचा अर्ज हिंदू विवाह कायदा १९५५ चे कलम १३–ब अन्वये आपसात संमतीने विवाह विच्छेदन करुन मिळणेकरीता दाखल करण्यात आला आहे.

**अर्जदारांचे थोडक्यात म्हणणे खालीलप्रमाणे –**

०२. अर्जदार क्र. १ आणि २ यांचा विवाह हिंदू धर्मशास्त्र प्रथेनुसार व रितीरिवाजानुसार दिनांक ०१/१२/२०१९ रोजी दत्त लॉन्स, चिंचपुर, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर येथे झाला असुन उभयंतांचे पती–पत्नीचे नातेसंबंध अद्यापही कायम आहेत. सदर लग्नसंबंधातुन उभयतांना कोणतेही अपत्य झालेले नसुन आजमितीस गरोदर देखील नाही. लग्नानंतर उभयंतांचे बरेच वैचारिक मतभेद झाल्याने त्यांचे आपसात पटेनासे झाले. त्यामुळे, दिनांक ०१/०१/२०२१ रोजी पासून अर्जदार क्र.१ व २ हे एकमेकांपासुन वेगळे राहत आहेत. त्यानंतर, उभयंतांमध्ये तडजोडीचे प्रयत्न होऊनही त्यांचेत आपसी तडजोड झालेली नाही. सबब, त्यांनी आपसी संमतीने घटस्फोट घेण्याचा निर्णय घेतला. सबब, दिनांक ०५/०३/२०२६ रोजी प्रस्तुतचा अर्ज सादर करण्यात आला.

०३. उभय पक्षांच्या अर्जातील कथनांवरुन खालील मुद्दे माझ्या विचारार्थ उपस्थित होतात. त्यांना मी माझ्या कारणमिंमासेसह खालीलप्रमाणे निष्कर्ष नोंदवित आहे.

| अनु.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| ०१. | अर्जदार क्र.१ व २ हे आपसी संमतीने घटस्फोटाचा हुकूमनामा मिळविण्यास पात्र आहेत काय ? | .. **होकारार्थी** |
| ०२. | काय आदेश ? | ..**अंतिम आदेशाप्रमाणे** |

## :: कारणमिमांसा ::

०४. उभय पक्षांतर्फे त्यांचे विद्वान विधिज्ञ यांचा युक्तीवाद ऐकला.

**मुद्दा क्र. १ बाबत** :–

०५. उभय पक्षांनी त्यांचेतील वैचारिक मतभेदांमुळे त्यांचा एकत्र संसार होणे शक्य नसल्याचे प्रतिज्ञापत्र (निशाणी क्रमांक ०६ व ०७) सादर केले आहे. अर्ज दाखल करण्यापूर्वी व अर्ज दाखल करण्यात आल्यानंतर झालेले तडजोडीचे प्रयत्न विफल झाल्याचे व ते घटस्फोटाच्या निर्णयावर ठाम असल्याचे उभय पक्षकारांनी आपल्या पुराव्याच्या प्रतिज्ञापत्रात (निशाणी क्रमांक १३ व १४) नमुद केले आहे.

०६. मी उभय पक्षकारांना प्रत्यक्ष विचारुन अर्ज व प्रतिज्ञापत्रातील (निशाणी क्रमांक ०६ व ०७) सदर मजकुराबाबत खात्री करुन घेतली. तसेच, त्यांनी घटस्फोटाचा घेतलेला निर्णय हा धाकामुळे अथवा प्रलोभनामुळे घेतलेला नसल्याची व सदर निर्णय हा पुर्ण विचारांती आणि राजीखुशीने घेतल्याबाबत उभय पक्षकारांना खुल्या न्यायालयात विचारुन खातरजमा करुन घेण्यात आली. उभय पक्षकारांनी ते त्यांच्या घटस्फोटाच्या निर्णयावर ठाम असल्याचे नमुद करुन अर्ज मंजुर करण्याची विनंती केली.

०७. वरील विवेचनावरुन उभय पक्षकारांचे लग्न दिनांक ०१/१२/२०१९ रोजी झाले असून प्रस्तुतचा अर्ज त्यांनी दिनांक ०५/०३/२०२६ रोजी दाखल केला आहे. म्हणजेच सदरचा अर्ज त्यांच्या लग्नानंतर एक वर्षाच्या कालावधीत दाखल केलेला नाही. उभय पक्षकार हे मागील एक वर्ष आणि सहा महिन्यापेक्षा जास्त कालावधीपासुन विभक्त राहत आहेत. प्रस्तुतचा अर्ज दाखल करण्यात आल्यानंतर प्रकरण मध्यस्थी प्रक्रीयेकरिता प्रशिक्षीत न्यायाधीश मध्यस्थ यांचेकडे पाठविण्यत आले. मात्र त्याठिकाणीही उभय पक्षांमध्ये एकत्र राहण्यासंदर्भात कुठलीही तडजोड होऊ शकली नाही. त्यानुसार प्रशिक्षीत न्यायाधीश मध्यस्थ यांनी आपला अहवाल – निशाणी क्रमांक

०८ सादर केला. त्यानंतर उभय पक्षांनी ते घटस्फोटाच्या निर्णयावर ठाम असल्याचे नमुद करुन त्याबाबत निशाणी क्रमांक १३ व १४ वर स्वतंत्रपणे पुरावाकामी प्रतिज्ञापत्र सादर केले व घटस्फोटाचा हुकूमनामा पारीत करण्याची विनंती केली. यावरुन उभय पक्षांमध्ये भविष्यात पुन्हा संसार सुरु होण्याची शक्यता नसल्याचे स्पष्टपणे दिसुन येते. त्याचप्रमाणे उभय पक्षांनी त्यांचेतील पोटगी आपसी संमतीने मिटविल्याचे त्यांचे अर्जात व प्रतिज्ञापत्रात नमुद केले आहे. अशा परिस्थीतीत पुढील सहा महिन्यांचा प्रतिक्षा कालावधी हा उभय पक्षांच्या नात्यातील वेदनांच्या तीव्रतेत वाढ करेल ही बाब ठळकपणे दिसुन येते. सबब मा. सर्वोच्च न्यायालयाच्या ***अमरदीप सिंग वि. हरविन कौर, MANU/SC/1134/2017*** या अधिनिर्णयातील निरिक्षणानुसार हिंदू विवाह कायद्यातील कलम १३ब (२) मधील सहा महिन्यांच्या प्रतिक्षा कालावधीची अट शिथील करण्याकरिता आवश्यक असलेल्या सर्व अटींची समाधानकारकरित्या पुर्तता झाल्याची माझी खात्री झाली आहे. सबब, हिंदू विवाह कायद्यातील कलम १३ब (२) मधील सहा महिन्यांच्या प्रतिक्षा कालावधीची अट अर्ज – निशाणी क्रमांक ०९ च्या आदेशानुसार शिथील करण्यात आली. या परिस्थीतीत उभय संमतीने घटस्फोट घेण्याच्या त्यांच्या निर्णयावर आजही पक्षकार ठाम असल्याने व तो निर्णय त्यांनी स्वेच्छेने घेतल्याचे निष्पन्न झाल्याने त्यांना उभय संमतीने घटस्फोटाचा हुकूमनामा नाकारण्यास काही एक कारण नाही. अर्जदार क्र.१ हिने अर्जदार क्र.२ कडुन एक रक्कमी रु.३५,००,०००/– स्वीकारली असुन अर्जदार क्र.२ विरुध्दचे सर्व स्थावर व जंगम मिळकतीतील हक्क कायमस्वरुपी सोडुन दिलेले असुन कायद्याने पत्नी म्हणुन प्राप्त झालेले सर्व हक्क देखील कायमस्वरुपी सोडुन दिलेले आहे. उभय अर्जदारांचे वैवाहिक जीवन पुढे सुरळीतपणे चालू राहिल अशी कोणतीही शक्यता दिसून येत नाही. या परिस्थीतीत त्यांना उभय संमतीने घटस्फोटाचा हुकूमनामा देणे त्यांच्या भावी आयुष्यासाठी आवश्यक असल्याचे दिसून येते. सबब, उभय पक्ष हे आपसी संमतीने घटस्फोटाचा हुकूमनामा मिळणेस पात्र असल्याच्या निष्कर्षाप्रत मी पोहचतो. सबब, मी **मुद्दा क्र.१ यावर होकारार्थी** निष्कर्ष नोंदवित आहे.

**मुद्दा क्र. २ बाबत** :–

०८. मुद्दा क्र.१ यावर मी होकारार्थी असा निष्कर्ष नोंदविल्याने, मी मुद्दा क्रमांक २ बाबत खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे :

आदेश

१) अर्ज मंजुर करण्यात येत आहे.

२) अर्जदार क्र.१– सौ. करिश्मा श्रीराम दिघे व अर्जदार क्रं.२ श्री. श्रीराम भास्कर दिघे यांचा दिनांक ०१/१२/२०१९ रोजी दत्त लॉन्स, चिंचपुर, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर येथे झालेला विवाह हिंदू विवाह कायद्याचे कलम १३–ब अन्वये आपसी संमतीने आजच्या तारखेपासुन विच्छेदीत करण्यात आल्याचे जाहीर करण्यात येत आहे.

३) हिंदू विवाह कायदा, १९५५ चे कलम २३(४) अन्वये हुकूमनाम्याची प्रत उभय पक्षांना विनामुल्य देण्यात यावी.

४) येणेप्रमाणे हुकूमनामा तयार करण्यात यावा.

JOSHI PRASAD BALKRISHNA

Digitally signed by JOSHI PRASAD BALKRISHNA
Date: 2026.03.12 17:12:26 +0530

स्थळः संगमनेर.

दिनांकः १२.०३.२०२६.

**( प्रसाद बा. जोशी )**
५ वे सह दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर,
संगमनेर, जि. अहमदनगर.